( ईन कॅमेरा )

**साक्षीदाराचे नाव कलम ३३(७) बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्याप्रमाणे गोपनीयतेकरिता वेगळ्या पाकीटमध्ये ठेवले.**

सरकारपक्षातर्फे सरतपासणी **साक्षीदार क्र.०४**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – **एस. एच. एच. (मुख्याध्यापक),**

वय – ४५ वर्षे,

धंदा – नौकरी,

राहणार – परभणी.

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. डी.यु. दराडे, सरकारी वकील</u>**

०१) वर्ष २०१५ पासून मी ××××× ×× ××××, ×××× येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहे. दिनांक १७.०३.२०२५ रोजी नानलपेठ पोलीस स्टेशन यांनी पीडित मुलीचा प्रवेश निर्गम उतारा मिळणेबाबत पत्र दिले होते. मला आता ते पत्र दाखविले. त्यावर प्राप्त म्हणून माझी सही आहे. सदरहू पत्रास **नि.पी.६१/पी.डब्ल्यू.०४** देण्यात आला.

०२) पीडित मुलगी एस.टी.एस.आर. (सा.क्र.१) माझे शाळेची विद्यार्थीनी आहे. मी माझे शाळेची प्रवेश निर्गम नोंदवही सोबत आणली आहे. नोंदवहीप्रमाणे पीडित मुलीचा प्रवेश आमच्या शाळेमध्ये दिनांक १५.०६.२०२३ रोजी वर्ग आठमध्ये झाला होता. नोंदवहीप्रमाणे पीडित मुलीची जन्म तारीख १५.०१.२०१० अशी आहे. पोलीसांच्या विनंतीप्रमाणे मी प्रवेश निर्गम उतारा जारी केला होता. मला आता उतारा दाखविला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी हेडमास्तर म्हणून सही आहे. सदरहू उताऱ्यास **नि.पी.६२/पी.डब्ल्यू.०४** देण्यात आला.

*१५.०७.२०२६*

*विशेष न्यायाधीश, परभणी.*

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए.ए. वैद्य, वकील</u>**

०३) हे म्हणणे खरे आहे की पीडित मुलीची पूर्वीची शाळा ही वेगळी आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या शाळेमध्ये जी जन्म तारीख नमुद होती तीच तारीख मी नोंदवहीमध्ये नोंदविली आहे. हे म्हणणे खरे नाही की नमुद केलेली जन्म तारीख ही चुकीची आहे.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

(आर.एम.सादराणी)

दिनांक – १५.०७.२०२६ विशेष न्यायाधीश, परभणी.